दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
: vvcmcestho@gmail.com

**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव**
**मुख्य कार्यालय विरार**
**यशवंत नगर, विरार (प)**
**ता. वसई, जि. पालघर - ४०१३०३**


**जावक क्र. वविशम/आस्था प्रशा-१/७६३/२०२६**
**दिनांक -१९/०६/२०२६**

संदर्भ:- मा. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र. विधिका २०२६/प्र.क्र.१६/नवि-२३ दि.०५ जून, २०२६.

महाराष्ट्र विधीमंडळाचे सन २०२६ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन दिनांक २२ जून २०२६ पासून मुंबई येथे सुरू होत आहे. विधीमंडळ अधिवेशनात तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, स्थगन प्रस्ताव व कामकाजाविषयक बाबी विधानमंडळ सचिवालयाकडून प्राप्त होत असतात. त्यानुसार विधीमंडळ कामकाज प्रायम्याने व विहित कालावधीत तसेच सुरळीत होणेकामी **श्री. धैर्यशील जाधव, परिवहन व्यवस्थापक** यांची "**समन्वय अधिकारी**" म्हणुन नेमणूक करणेत येत आहे. समन्वय अधिकारी यांनी संदर्भिय पत्रात नमूद केल्याप्रमाणे कामकाज पहावे.

तसेच विधानमंडळ कामकाजा संदर्भात शासनाशी पत्रव्यवहार करतांना संबंधित विषयाशी निगडीत "**अतिरिक्त आयुक्त**" यांचे स्वाक्षरीने करण्यात यावा.

Digitally signed by
Sanjay Hirappa Herwade
Date: 19-06-2026
13:12:12

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

(संजय हेरवाडे)
अतिरिक्त आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रति,**

श्री. धैर्यशील जाधव, परिवहन व्यवस्थापक वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रत :-**

१. मा. उपसचिव, नगरविकास विभाग, नवि-२३, मंत्रालय, मुंबई.
२. अतिरिक्त आयुक्त (उ.) वसई विरार शहर महानगरपालिका
३. उपायुक्त (सर्व)
४. विभागप्रमुख (सर्व)
५. सहा. आयुक्त / प्र.सहा. आयुक्त (सर्व)
६. आस्थापना निवडनस्ती.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग

चौथा मजला (मुख्य इमारत), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-३२
Email ID : ud23-urban@mah.gov.in

---

विधानमंडळ कामकाज प्राथम्य

क्र. विधिका-२०२६/प्र.क्र.१६/नवि-२३ दि. ०५ जून, २०२६.

**प्रति,**

१) आयुक्त, ठाणे महानगरपालिका, जि.ठाणे
२) आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जि.ठाणे
३) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका, जि.पालघर
४) आयुक्त, पनवेल महानगरपालिका, जि.रायगड

**विषय : सन २०२६ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन कालावधीमध्ये उपायुक्त यांची नियुक्ती करण्याबाबत...**

**महोदय,**

महाराष्ट्र विधिमंडळाचे सन २०२६ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दि. २२ जून, २०२६ पासून मुंबई येथे सुरू होत आहे. विधीमंडळ अधिवेशनात तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना इ. बाबी विधानमंडळ सचिवालयाकडून प्राप्त होत असतात. तद्नुषंगाने विधीमंडळ कामकाज प्राथम्याने व विहित कालावधीत पार पाडणे अनिवार्य आहे.

०२. **विधीमंडळ कामकाजाचे प्राथम्य विचारात घेता, विधीमंडळ कामकाजाचे अनुभव असलेल्या किमान उप आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याची संपूर्ण अधिवेशन कालावधीकरिता समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करावी, ही विनंती.**

०३. विधीमंडळ कामकाजाच्या सुलभतेच्या अनुषंगाने खालील कार्यपध्दतीचा अबलंब करण्याबाबत आपल्या स्तरावरुन संबंधितांना आवश्यक ते निर्देश देण्यात यावेत, ही विनंती :

I. विधानमंडळ आयुधांशी संदर्भात अभिप्राय / अहवाल हे आयुक्त अथवा अतिरिक्त आयुक्त यांच्या स्वाक्षरीने करावे.

II. ताारांकित प्रश्नाचे उत्तर व पूरक टिप्पणी यातील माहिती अचूक व मुद्देसुद असल्याची खात्री करुन त्यात उल्लेखित सर्व संदर्भ अहवालासोबत पाठविण्यात यावे. सदर माहिती ही ई-मेलद्वारे पाठविण्यात येत असताना, या माहितीची सॉफ्ट कॉपी सुध्दा उपलब्ध करुन देण्यात यावी.

III. लक्षवेधी सूचनेचा अहवाल हा विहित कालमर्यादेत शासनास बिनचूक व मुद्देसुद माहितीसह सादर करण्यात यावा. तसेच सदर अहवालात नमूद सर्व संदर्भ जोडण्याची दक्षता घ्यावी.

IV. विधानमंडळाच्या कामकाजादरम्यान नियम २९३, नियम २६०, अंतिम आठवडा चर्चा, अर्थसंकल्पावरील चर्चा इ. विषयक कामकाजावेळी महानगरपालिकेशी संबंधित उपस्थित मुद्द्यांबाबतची माहिती ही या पत्रासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नमुन्यात (प्रपत्र-अ) संक्षिप्त व अचूकपणे त्या दिवसाचे विधानमंडळ कामकाज संपण्यापूर्वी शासनास पाठवावी. सदरील माहिती ही विहित कालमर्यादेत उपलब्ध होण्याकरिता समन्वय अधिकाऱ्यांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी.

तसेच सदरील माहिती ही मुद्देनिहाय स्वतंत्रपणे (एका मुद्याकरिता एक) याप्रमाणे पाठविण्याची खबरदारी घ्यावी.

V. दिवसाचे कामकाज समाप्त झाल्यानंतर दुसऱ्या दिवसाची कार्यक्रम पत्रिका (Order Of The Day) ही विभागास रात्री उशिराने प्राप्त होत असते. सदर कार्यक्रम पत्रिकेमध्ये महानगरपालिकेशी संबंधित बाबी असल्यास त्यानुषंगाने माहिती उपलब्ध होण्याकरिता व आवश्यक कार्यवाहीकरिता महानगरपालिकेच्या समन्वय अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांना दूरध्वनीद्वारे तात्काळ संपर्क करणे क्रमप्राप्त ठरते. यास्तव, आपल्या अधिनस्त सर्व विभागप्रमुखांना अधिवेशन कालावधीत दूरध्वनीद्वारे / गरज भासल्यास व्यक्तिशः उपलब्ध राहण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

VI. विधीमंडळ कामकाजाच्या अनुषंगाने ज्या दिवशी मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास विभाग) महोदय व मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदया यांनी पूर्व चर्चेसाठी उपस्थित राहण्यासाठी निर्देश दिले असतील, त्या दिवशी संबंधित आयुक्त यांनी आवश्यक त्या माहिती व कागदपत्रांसह उपस्थित राहावे.

VII. विधीमंडळ कामकाजाकरिता उपस्थित राहण्याची आवश्यकता असल्यास वा मा.मंत्री / मा.राज्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार उपस्थित राहण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना समन्वय अधिकाऱ्यांमार्फत सूचित करण्यात येईल.

VIII. विधानमंडळ कामकाजाच्या दिवशी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या विधानमंडळ प्रवेशाची व्यवस्थेबाबत महानगरपालिकेने आवश्यक कार्यवाही करावी.

तसेच विधानमंडळाच्या अधिवेशनापूर्वी समन्वय अधिकाऱ्यांना शुक्रवार दि. १९ जून, २०२६ रोजी दुपारी ०३ वाजता उप सचिव (नवि-२३) यांच्या दालनात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(अनिरुध्द गोसावी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत: प्रपत्र-अ